21 DEC 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तणकटातून जैवप्लास्टिक, मोबाईलवरील कृषी रोबोट

## विद्यापीठात 'आविष्कार' संशोधन महोत्सव; विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवांचे प्रतिबिंब

> “विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सर्वच प्रकल्पांमध्ये त्यांच्या सामाजिक जाणिवांचे प्रतिबिंब उमटले आहे. त्यातून समाजाच्या समस्या निराकरणाबरोबरच सर्वसामान्य नागरिक, शेतकरी यांचे जीवन सुखकर आणि आरोग्यदायी बनविण्याची तळमळ दिसून येते.
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

कोल्हापूर, ता. २० : तणकटापासून जैवप्लास्टिक निर्मिती, मोबाईलवरून नियंत्रित करता येणारे कृषीरोबोट यंत्र, मोबाईलवरील फिशिंग हल्ला ओळखणारी मशीन लर्निंग योजना, अशा विविध स्वरूपांतील संशोधनाचा विद्यार्थ्यांनी साकारलेला आविष्कार आज शिवाजी विद्यापीठात पाहायला मिळाला. निमित्त होते विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवाचे.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात विद्यार्थी विकास विभाग आणि रसायनशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. सद्यःस्थितीत शेतकरी, नागरिकांना भेडसावणाऱ्या व्यक्तिगत ते स्थानिक सामाजिक समस्यांवर संशोधनाच्या सहाय्याने पर्याय शोधण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये आविष्कार संशोधन महोत्सवातील सादरीकरणाची पाहणी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी आज पदवीस्तरीय ५२ आणि संशोधनस्तरीय ५० अशा एकूण १०२ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून संशोधनपर प्रकल्प, पोस्टर सादर केले. त्यात सुरक्षित कृषीपंपासाठी आरएफआयडी आधारित शॉकरहित चालू-बंद यंत्रणा, शारीरिक तणाव मापन यंत्रणा, अतिसंवेदनशील वीजमापन यंत्र, मूत्रमार्ग संसर्गावर उपचारांसाठी चांदीच्या नॅनोपार्टिकल्सचे हरित संश्लेषण, जैववैद्यकीय उपकरणे, वनस्पतींपासून वेदनाशामक औषधनिर्मिती, फुफ्फुसाच्या कर्करोगावर नावीन्यपूर्ण उपचार पद्धती, ड्रॅगन फ्रूटपासून आईस्क्रीम, स्मार्ट वॉटर कन्ट्रोल सिस्टीम, ग्लुटेन फ्री कुकीज, अवजड ट्रेलर्ससाठी हायड्रॉलिक स्टॉपर, रेल्वे अपघातरोधक यंत्रणा, बिलिंग यंत्रणा, सज्ज स्मार्ट शॉपिंग ट्रॉली यांसह भारतीय खाद्यसंस्कृती, द्राक्षशेती उत्पादन वृद्धी, महिला सबलीकरण कायदे, प्रवीण बांदेकर यांच्या साहित्यातील देशीवाद, विटा येथील यंत्रमागावरील वस्त्रोद्योग, आदी संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, तानाजी चौगुले, सागर डेळेकर, कैलास सोनावणे, डी. एन. दगडे, डी. एम. पोरे, डी. एस. भांगे, एस. एन. तायडे, के. एम. गरडकर, एस. एस. कोळेकर, पी. व्ही. अनभुले, जी. एस. राशिनकर, एम. ए. लंकापाळे, राहुल माने, सोमनाथ पवार, आदी उपस्थित होते.

### स्टार्टअपसाठी ५४ प्रकल्पांचे सादरीकरण

स्पर्धेत मानव्यशास्त्र, भाषा आणि कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, तसेच वैद्यकीय आणि औषधनिर्माण या सहा श्रेणींमध्ये विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादरीकरण केले. ५४ प्रकल्पांचे सादरीकरण स्टार्टअपसाठी करण्यात आले. उद्या, शनिवारी पदव्युत्तरस्तरीय स्पर्धा सादरीकरण होणार असून, यामध्ये २०८ पोस्टर, ३८ प्रकल्पांचे सादरीकरण होणार आहे.

21 DEC 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आविष्कार' सर्जनशीलतेचे प्रतिबिंब

## कर्करोगावर उपचारांपासून ते तणाव मापनापर्यंतचे प्रकल्प : ५४ स्टार्टअपसाठीही सादरीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात भरविण्यात आलेल्या दोनदिवसीय विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये विद्यार्थी व संशोधकांमधील सर्जनशीलतेबरोबरच सामाजिक जाणिवांचे प्रतिबिंब पडल्याचे दिसून आले. या महोत्सवाचे शुक्रवारी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.

विद्यार्थी विकास विभाग आणि रसायनशास्त्र अधिविभाग यांच्यावतीने आयोजित आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सुरू आहे.

सद्य:स्थितीत मानवी समुदायाला भेडसावणाऱ्या व्यक्तिगत ते स्थानिक सामाजिक समस्यांवर संशोधनाच्या साहाय्याने पर्याय शोधण्याचा प्रयत्न विद्यार्थी करत असल्याचे दिसून आले. या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी पदवी स्तरीय ५२ आणि संशोधनस्तरीय ५० अशा एकूण १०२ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून संशोधनपर प्रकल्प, पोस्टर सादर केले. मानव्यशास्त्र, भाषा आणि कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान तसेच वैद्यकीय आणि औषधनिर्माण या सहा श्रेणींमध्ये विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादरीकरण केले. त्या १२ मॉडेल्सचाही समावेश होता. यामधील ५४ प्रकल्पांचे सादरीकरण स्टार्टअपसाठी करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये शुक्रवारी आविष्कार संशोधन महोत्सवांतर्गत मांडलेल्या प्रकल्पांची कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी पाहणी केली. प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### नवोन्मेषी प्रकल्पांवर भर

महोत्सवात सादर करण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये अनेक नवोन्मेषी संशोधन प्रकल्पांचा समावेश होता. त्यात नागरिक, शेतकरी यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठीचे प्रकल्प होते. तणकटापासून जैव प्लास्टिक निर्मिती, मोबाईलवरून नियंत्रित करता येणारे कृषी रोबोट यंत्र, मोबाईलवरील फिशिंग हल्ला ओळखणारी मशीन लर्निंग यंत्रणा, सुरक्षित कृषी पंपासाठी आरएफआयडी आधारित शॉकरहित चालू-बंद यंत्रणा संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले.

### संशोधक विद्यार्थ्यांचा सहभाग

आविष्कार महोत्सवांतर्गत आज शनिवारी पदव्युत्तर स्तरीय स्पर्धा सादरीकरण होणार असून यामध्ये २०८ पोस्टर तसेच ३८ प्रकल्पांच्या मॉडेल्सचे सादरीकरण संशोधक विद्यार्थी करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2024
लोकमत

# 'बांधावरची झाडे' सद्भाव निर्माण करणारे

## नंदकुमार मोरे : व्ही. एन. शिंदे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे 'बांधावरची झाडे' हे पुस्तक निसर्गाकडे पाहण्याचा सद्भाव निर्माण करणारे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी शुक्रवारी केले. कुलसचिव तथा विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या 'बांधावरची झाडे' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.



डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या 'बांधावरची झाडे' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. डॉ. मनोहर वासवानी, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. राजश्री बारवेकर आणि डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. मोरे म्हणाले, डॉ. शिंदे यांचे हे पुस्तक निसर्गाकडे पाहण्याची नवी दृष्टी प्रदान करणारे आहे. त्याचप्रमाणे यामध्ये निसर्ग, परिसर विज्ञान, साहित्य, इतिहास, पुराण, मिथके, मानववंशशास्त्र, लोकसाहित्य, भूगोल, वैद्यक, संज्ञाशास्त्र, कृषी, संस्कृती, अन्नसंस्कृती इत्यादी अनेकविध विषयांचा समावेश असल्याने ते मराठी भाषेची साहित्यिक परिभाषादेखील वृद्धिंगत करणारे आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'बांधावरची झाडे' हे पुस्तक शेतकऱ्याशी वाचकाचे नाते अधिक दृढ करणारे आहे. विविध विद्याशाखांच्या मिलाफातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश त्यांनी यामध्ये दिला आहे.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, कविवर्य वसंत आबाजी डहाके यांच्या 'झाड' या कवितेमुळे झाडे वाचण्याची प्रेरणा मिळाली आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे लिखाणासाठी प्रोत्साहन लाभले. डॉ. प्रभंजन माने यांनी स्वागत केले. डॉ. सुखदेव एकल यांनी सूत्रसंचालन केले, तर अमोल देशमुख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2024
सकाळ



कोल्हापूर : विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या 'बांधावरची झाडे' या पुस्तकाचे प्रकाशन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डावीकडून डॉ. मनोहर वासवानी, चंद्रकांत लंगरे, तृप्ती करेकट्टी, पी. एस. पाटील, नंदकुमार मोरे, प्रभंजन माने, राजश्री बारवेकर, शिवाजी जाधव.

# 'बांधावरची झाडे' निसर्गाकडे पाहण्याचा सद्‌भाव निर्माण करणारे : डॉ. मोरे

## डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : 'विज्ञानलेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे 'बांधावरची झाडे' पुस्तक निसर्गाकडे पाहण्याचा सद्भाव निर्माण करणारे आहे. यामध्ये निसर्ग, परिसर विज्ञान, साहित्य, इतिहास, पुराण, मानववंशशास्त्र, लोकसाहित्य, कृषी, संस्कृती, अन्नसंस्कृती आदी अनेकविध विषयांचा समावेश असल्याने ते मराठी भाषेची साहित्यिक परिभाषाही वृद्धिंगत करणारे आहे,'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी आज येथे केले.

कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या 'बांधावरची झाडे' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा विद्यापीठाच्या मराठी व इंग्रजी अधिविभागातर्फे व्यवस्थापन परिषद सभागृहात झाला, त्यावेळी डॉ. मोरे बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''डॉ. शिंदे कविमनाचे भौतिकशास्त्रज्ञ आहेत, हे या पुस्तकाच्या वाचनातून लक्षात येते. एकाग्रता, अनेकाग्रता आणि समग्रता या त्रयींच्या संगमातूनच अशी साहित्यिक नवनिर्मिती करणे त्यांना शक्य झाले असावे.''

लेखक डॉ. शिंदे म्हणाले, ''कविवर्य वसंत आबाजी डहाके यांच्या 'झाड' या कवितेमुळे झाडे वाचण्याची प्रेरणा मिळाली आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे लिहिण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. त्यातून राज्याच्या कानाकोपऱ्यात शेताच्या बांधावर आढळणाऱ्या झाडांवर लिहावेसे वाटले. त्यातून हे पुस्तक साकारले.''

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''डॉ. शिंदे पर्यावरणाच्या सान्निध्यात रमणारे असल्याने त्या सान्निध्यातूनच त्यांच्या साहित्यनिर्मितीला चालना मिळाली. 'बांधावरची झाडे' पुस्तक शेतकऱ्यांशी वाचकाचे नाते दृढ करणारे आहे. विविध विद्याशाखांच्या मिलाफातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश त्यांनी दिला आहे.''

कार्यक्रमास डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, तृप्ती करेकट्टी, चंद्रकांत लंगरे, राजश्री बारवेकर, मनोहर वासवानी, शिवाजी जाधव, विनोद कांबळे, दीपक भादले उपस्थित होते. डॉ. प्रभंजन माने यांनी स्वागत केले. डॉ. सुखदेव एकल यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ परीक्षेला ५२ हजार १९६ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ५२ हजार १९६ विद्यार्थी हजर होते. गुरुवारी बीए, बीकॉम, बीएस्सी, एमए, एमकॉम, एमबीए, एमएस्सी, बीबीए, बीसीए, एमसीए, बीएबीएड, बीटेक, एलएलबी, बीएसडब्ल्यू एमएड आदी ४६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १९६ केंद्रांवर सुरळीत झाल्या. दि. २० रोजी बीएस्सी (ॲनिमेशन), इन्व्हायर्न्मेंटल सायन्स, बीव्होक (टूरिझम अँड सर्व्हिस), बीव्होक (सस्टीनेबल ॲग्री मॅनेजमेंट), बीव्होक (प्रिंटिंग अँड पब्लिकेशन), एमएसडब्ल्यू, एलएलएम आदी १५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2024
पुण्यनगरी

# लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे विद्यापीठ स्पर्धेत यश

**। सातारा :** यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, वारणानगर येथे पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय आर्चरी स्पर्धेमध्ये लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात आर्चरी संघाने आतापर्यंतची परंपरा कायम राखत आठ गोल्ड मेडलची कमाई केली. या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवड ओरिसा येथील भुवनेश्वर येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ ऑल इंडिया स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

यामध्ये कंपाऊंडसाठी रांगोळी स्वर सारंग बी.एसी. फर्स्ट, सानिका विजय मोरे बी.ए.भाग दोन, आदिती गोपीचंद स्वामी बीए. भाग एक, प्रांजल अजय वाईकर बीएससी भाग एक, इंडियन या प्रकारात आशुतोष सुनील भोसले बीए भाग तीन तसेच रिकव्हर या प्रकारामध्ये प्रणव प्रकाश माळवेकर बी.एससी. भाग दोन, साहिल लक्ष्मण शेलार बीएससी भाग एक, धनश्री प्रशांत जाधव बीए. भाग तीन या सर्व खेळाडूंची निवड झालेले आहे.

याप्रसंगी या सर्व खेळाडूंना प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या यशस्वी खेळाडूंना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य डॉ. शुभांगी गावडे, विश्वस्त कौस्तुभ गावडे यांचे आशीर्वाद लाभले.